# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक

क्र. एमओएम/५४९ दि. १४.०७.२०२२

विषय:- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ:- १)क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४ दि.२०.०६.२०२२
२)जा.क्र.स्वा.अ.ग्रा.वि.क्षे.अ./२०२२ प्र.क्र./२९ दि.०६.०७.२०२२
३)क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२११/नवि-२० दि.०७.०७.२०२२
४)क्र.सी/कार्या -७डी एच/स्वातंत्र्याचा अमृत महो.इतिवृत्त/२२ दि.०७.०७.२०२२
५)क्र.नपप्रसं/२०२२/हर घर तिरंगा उपक्रम/कक्ष-१४/२९५१ दि.०८.०७.२०२२

श्री.मिलिंद सावंत, सह आयुक्त, नगर परिषद प्रशासन संचालनालय,मुंबई, श्रीम.प्रियांका कुलकर्णी-छापवाले, उप सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, श्री.राजेश कुमार,भा.प्र.से. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व श्री.विलास रा.थोरात, उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांची पत्रे पहावीत.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात. स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतीकारक/स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी घेतलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२०.०६.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत.

तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०७.२०२२ रोजी दु.०४.०० वाजता झालेल्या आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या बैठकीत दि.०९ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आयोजित करावयाच्या कार्यक्रमाबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत.

"हर घर तिरंगा" या उपक्रमाचे नियोजन पुढीलप्रमाणे करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत.

| अनु.क्र | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | कार्यक्रमाची रुपरेषा, घरांची संख्या-लक्ष्य निर्धारित करुन शासनास कळविणे. | दि.०८ जुलै, २०२२ |
| २ | विविध स्तरावर हर घर तिरंगा उपक्रमाबाबत प्रशिक्षण, जाणीवजागृती करणे | दि.०७ जुलै ते १५ जुलै, २०२२ |
| ३ | विविध स्तरावर लक्ष्य संख्यानुसार झेंडा पुरवठादार निश्चित करणे | दि.११ जुलै ते १५ जुलै, २०२२ |
| ४ | शाळा, कॉलेजेस, एनसीसी, एनएसएस इत्यादी मधून तिरंगा वॉलेंटियर्स म्हणून नियुक्त करणे. | दि.१६ जुलै ते २० जुलै, २०२२ |
| ५ | शहरी भागातील घरांवर, दुकाने, विविध संस्था, कार्यालयांवर तिरंगा फडकविणेसाठी उपलब्ध झेंड्याची संख्या निर्धारित करणे. | दि.२० जुलै ते ३० जुलै, २०२२ |

उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने दि. ११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत 'हर घर तिरंगा' उपक्रम राबविणे व भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दि.०९ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेत 'स्वराज्य महोत्सव' अंतर्गत विविध कार्यक्रम,

उपक्रम यशस्वीरीत्या जास्तीत जास्त जन सहभागातून आयोजन करण्यासाठी नियोजन करण्याबाबत खालील सदस्यांची 'कार्यान्वयन समिती 'गठीत करण्यात आली आहे.

१)मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त(शहर) - अध्यक्ष
२)सह आयुक्त (सा.प्र.) - सचिव, समन्वयक
३)उप आयुक्त (परिमंडळ १ ते ७) - सदस्य
४)शिक्षणाधिकारी - सदस्य
५)सहायक आयुक्त (नियोजन) - सदस्य
६)वरिष्ठ पुरातन वास्तु जतन अभियंता - सदस्य
७)करनिर्धारक व संकलक - सदस्य
८)कार्यकारी आरोग्य अधिकारी - सदस्य
९)वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) - सदस्य
१०)जनसंपर्क अधिकारी - सदस्य
११)उद्यान अधीक्षक - सदस्य
१२)कार्यकारी अभियंता (परिरक्षण) मुख्यालय - सदस्य
१३)संचालक (माहिती तंत्रज्ञान) - सदस्य

सदर समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे:-

| अनु.क्र. | कार्यान्वयन समितीचे सदस्य | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | उप आयुक्त (परिमंडळ १ ते ७) | **i)** संबंधित परिमंडळातील विभागीय सहायक आयुक्त यांना 'हर घर तिरंगा' बाबत त्यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व शासकीय /निमशासकीय संस्था/खाजगी आस्थापना/ सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांच्या इमारतींवर तसेच स्थानिक नागरिकांना त्यांच्या घरावर/इमारतीवर **दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** तिरंगा फडकविण्याबाबतची जाणीवजागृती करून द्यावी याकरिता निदेश द्यावेत. तसेच तिरंगा नि:शुल्क असणार नाही, त्यामुळे नागरिकांनी तो स्वेच्छेने विकत घेण्यासाठी लोकांना प्रेरित करण्यात यावे.<br>**ii)**यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची कार्यालये, रुग्णालये, शाळा इत्यादींवर राष्ट्रध्वजाची उभारणी करण्यासाठी राष्ट्रध्वजांची संख्या निश्चित करुन **दि.११ जुलै, २०२२ ते दि.१५ जुलै, २०२२** पर्यंत झेंडा पुरवठादार निश्चित करावे. आवश्यक असणारे झेंडे नगर विकास विभागाने कळविल्यानुसार महाराष्ट्रातील तिरंगा झेंडा पुरवठादारांकडून ठोक स्वरुपात झेंडा खरेदी करण्याकरिता निदेश द्यावेत.<br>**iii)** तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाची माहिती/लोगो याबाबतचा प्रचार शाळा, कॉलेज, बाजार इ. ठिकाणी करावा. तसेच यासाठी लोकप्रतिनिधींना |

| | | |
|---|---|---|
| | | सहभागी करुन घ्यावे. कार्यक्रमाची रुपरेषा आखावी तसेच त्याबाबत प्रशिक्षण द्यावे.<br>**iv)** सर्व निवासी व अनिवासी मालमत्तांवर **दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत तिरंगा फडकविण्यात आला आहे किंवा नाही ते पहावे.<br>**v)** बृहन्मुंबई महानगरपालिकेत सदर उपक्रमाबाबत विशेष सभांचे आयोजन करण्यात यावे.<br>**vi)** स्थानिक स्तरावरून पालकमंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी /सदस्य, इतर प्रतिष्ठित नागरिक, खेळाडू, अधिकारी यांच्याव्दारा हर घर तिरंगा अभियानाबाबत आवाहन करण्यात यावे.<br>**vii)**तिरंगा झेडा संहिताचे पालन करावे याकरिता नागरिकांना माहिती देण्यात यावी.<br>**viii)**महानगरपालिकेच्या कार्यालयात झेंड्याच्या साठवणूक आणि विक्री केंद्रासाठी जागेची व्यवस्था करावी.<br>**ix)**महानगरपालिका क्षेत्रातील घरांची, संस्थांची निश्चिती, त्यासाठी आवश्यक झेंड्यांची संख्या, त्यांची खरेदी, वितरण, उत्पादन, प्रत्यक्षात झेंडे लावणे इत्यादीं बाबींची पूर्तता, संपूर्ण नियोजन करण्याची जबाबदारी घ्यावी.<br>**x)** महानगरपालिका कार्यालयाच्या प्रतिक्षालयात डिजिटल पडदे लावून ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे. |
| २ | शिक्षणाधिकारी | **i)** शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीवजागृती करणे.<br>**ii)** राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने/शिबिरे/चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करावे.<br>**iii)** हर घर तिरंगा या हॅशटॅग खाली राज्य/जिल्हा/शाळा या विषयी नमूद करुन समाजमाध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत.<br>**iv)** तसेच सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचनापत्रे, पत्रके वितरीत करावीत. पालक-शिक्षक सभांचे आयोजन करावे.<br>**v) दि.११ ते १७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत शालेय/महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांवर होणाऱ्या मोबाईल दुष्परिणाम मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करावे. **दि.०९ ते १७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत शालेय/महाविद्यालय स्तरांवरून विविध स्पर्धा निबंध, वक्तृत्व/चित्रकला स्पर्धा आयोजित कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | | **vi)** विविध स्तरातून सहकार्य मिळविण्यासाठी शाळा/महाविद्यालये, एनसीसी, एनएसएस, स्वंयसहाय्यक समुह इत्यादींमधून तिरंगा वॉलेंटीयर्स म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच **दि.०९ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.००** वाजता शाळेत/महाविद्यालयात राष्ट्रगान कार्यक्रम आयोजित करावे व **दि.१५ ऑगस्ट, २०२२** रोजी एनसीसी/एनएसएस कॅडेटचे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन / मॅरेथॉनचे आयोजन करण्यात यावे.<br>**vii)** महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये/कॉलेजमध्ये **दि.१५ ऑगस्ट, २०२२** रोजी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील ऐतिहासिक ठिकाणी एनजीओ/सामान्य नागरिकांच्या सहभागातून पदयात्रा काढण्यात यावी. |
| ३ | सहायक आयुक्त (नियोजन) | **i)** स्थानिक शिलाई काम करणाऱ्या महिला बचत गटांव्दारे ध्वजांची शिलाई/निर्मिती करण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>**ii)** महिला मेळावे/किशोरी मेळावे यांचे आयोजन करण्यात यावे. तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे **दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत प्रदर्शन भरविण्यात यावे. |
| ४ | वरिष्ठ पुरातन वास्तु जतन अभियंता | **i) दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत महानगरपालिका क्षेत्रातील सर्व हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करावे. |
| ५ | करनिर्धारक व संकलक | **i)** माजी सैनिकांना तसेच सैनिकांच्या विधवांना शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेल्या मालमत्ता सूटीबाबत व्यापक प्रसिध्दी देणे आणि याबाबतच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मेळावे आयोजित करावे. |
| ६ | कार्यकारी आरोग्य अधिकारी | **i) दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या हर घर तिरंगा या कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व रुग्णालये व आरोग्य केंद्रे यांना सहभागी करुन घ्यावे.<br>**ii)** या दरम्यान प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत. तसेच सर्व रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावून ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आझादी का अमृत महोत्सव इ.बाबतचे चित्रपट दाखवावेत.<br>**iii)**तसेच महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालये यांच्या इमारतींवरदेखील तिरंगा |

| | | |
|---|---|---|
| | | फडकविण्याबाबत जाणीवजागृती करावी.<br>**iv)** प्रसुतीगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंगाची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.<br>**v)** लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद उपलब्ध करुन द्यावेत. |
| ७ | वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) | **i)** सर्व दुकाने व आस्थापना यांच्या इमारतींवर **दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत तिरंगा फडकविण्यात आला असल्याची खातरजमा करावी. |
| ८ | जनसंपर्क अधिकारी | **i) दि.०९ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, थोर व्यक्तिमत्व यांचा महाराष्ट्रातील जडणघडणीतील सहभाग यावर कार्यक्रम आयोजित करावा.<br>**ii)** प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इत्यादी स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.<br>**iii)** तसेच महानगरपालिकेच्या मालकीची सांस्कृतिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे येथे रोषणाई करुन त्या स्थळांचा इतिहास नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्याचप्रमाणे वरळी - वांद्रे सी लिंक सारखी महत्त्वाची ठिकाणे ठरवून सदर वास्तुंवर/ठिकाणांवर आकर्षक विद्युत रोशणाई करणे.<br>**iv)** अनाम वीर, स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे यांचे दुर्मिळ फोटो व त्यांच्या कार्याची माहिती यासाठी प्रदर्शन, कार्यक्रम आयोजित करावे व स्वातंत्र्य चळवळीशीं निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात यावे. |
| ९ | उद्यान अधीक्षक | **i) दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि.१७ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत महानगरपालिकेच्या जागेवर शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करावे. |
| १० | कार्यकारी अभियंता (परिरक्षण) मुख्यालय | **i)** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी स्वातंत्र्य दिनी तिरंगी रंगाचे फुगे आकाशात सोडावे. |
| ११ | संचालक (माहिती तंत्रज्ञान) | **i)** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आझादी का अमृत महोत्सव संकेतस्थळाची लिंक तयार करुन ती Har Ghar Jhanda Corner (amritmahotsav.nic.in) येथे प्रदर्शित करावी. |

राष्ट्रध्वज खरेदी करण्याकरिता नगर विकास विभागाकडून कळविण्यात आलेल्या खालील नमूद झेंडा पुरवठादारांकडून राष्ट्रध्वज खरेदी करण्यात यावे:-

१) KVIC

२)NCCF केंद्र सरकार उपक्रम.

३)GEM पोर्टल

४)स्थानिक विक्रेते, स्वयंसहाय्यता महिला समूह इ.

५)Indiamart सारखी ऑनलाईन खरेदी

६)याशिवाय मुंबईत द फ्लॅग कंपनी वसई, द फ्लॅग शॉप इ.

७)तसेच भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून कळविण्यात आलेले काही तिरंगा पुरवठादाराचे संपर्क श्री. कबीर कुमार-७०९१४७२५५५, ८८००२६५७७९ ई-मेल aniratcontracts@gmail.com याप्रमाणे असून मुंबईतील आणखी एक पुरवठादार श्री.पुष्कर नाईक-८८००४८८०३०, ९८५९५८८३२५ हे असून जे NCCF आणि खरेदीदार यांच्यात समन्वय साधून प्रभागस्तरावर झेंडे वाटपाबाबत सुध्दा पर्याय वापरता येईल.

तसेच राष्ट्रध्वज खरेदी करण्याकरिता येणारा खर्च २२०८००१००-Ceremony/Event Expense या अर्थसंकल्पिय शीर्षातून भागविण्यात यावा अथवा सदर शीर्षात तरतूद उपलब्ध नसल्यास, २२० च्या सिरीजमधून खाते/विभाग प्रमुखांच्या परवानगीने सदर खर्च पुनर्वाटप करुन भागवावा.

हर घर तिरंगा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालीलप्रमाणे सहाय्य देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी व आवश्यकता भासल्यास सदर सहाय्य घेण्यात यावे.

१)आजादी का अमृत महोत्सव (amritmahotsav.nic.in) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर लिंक उपलब्ध आहे.

२)अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहे.

३)जाहिरात फलक, बॅनर्स,फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इत्यादींचे नमुने उपलब्ध आहेत.

४)ध्वजगीत व ध्वनिचित्रफित उपलब्ध आहेत.

सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नगर विकास विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्यविभाग व ग्रामविकास विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई यांना ud20.urban-mh@mah.gov.in, maharddat75@gmail.com, mahaculture@gmail.com, maha.amrutbharat@gmail.com या ई-मेल वर पाठवावा.

| | | |
|---|---|---|
| सही/-१४.०७.२०२२ | सही/-१४.०७.२०२२ | सही/-१४.०७.२०२२ |
| (अपूर्वा मोरे) | (मिलिन सावंत) | (आशीष शर्मा) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) |

प्रकअ/१०७
२०२२-२३

सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमओएम/५४९ दि. १४.०७.२०२२

प्रत - ---------------------------------------------------------------

यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(signature) 14/07/2022

(श्रीम. लीना ता.शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)

प.१

महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र ,२४९२७६३१-०२२.विस्तारीत क्र११५.
ई-मेल- dmacorp14@gmail.com
संकेतस्थळ- https://mahadma.maharashtra.gov.in

7 वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका
इमारत, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-400614
कार्यासन क्र १४.

क्र. नपाप्रसं/२०२२/हर घर तिरंगा उपक्रम/कक्ष १४/2951

दिनांक 8 JUL 2022

प्रति,
मा. आयुक्त (सर्व महानगरपालिका)

**विषय :- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याबाबत.**

**संदर्भ :-उप सचिव, महाराष्ट्र शासन नवि २० यांचे क्र. संकीर्ण-२०२१ / प्र.क्र. २११/नवि -२० दिनांक ०७.०७.२०२२ रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्राचे (प्रत संलग्न) कृपया अवलोकन व्हावे. सदर विषयांकित प्रकरणी या उपक्रमासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नगर विकास विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व ग्राम विकास विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई यांना ई-मेलवर (ud20.urban-mh@mah.gov.in,maharddat75@gmail.com,mahaculture@gmail.com ,maha.amrutbharat@gmail.com ) पाठविण्यात यावा, हि विनंती.

(मिलिंद सावंत)
**सह आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

8 JUL 2022
Issue

Scanned by CamScanner

प.२

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय-मुंबई, ३२.

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२७९४२०७ Email ID - ud२०.urban-mh@mah.gov.in

क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र. २११/नवि-२० दिनांक : ०७ जुलै, २०२२

प्रति,

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई महानगरपालिका कार्यालय,
बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

विषय :- स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ : १) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे सादरीकरण दि.१२ एप्रिल २०२२ व दि.२० मे २०२२
२) भारतीय ध्वज संहिता २००५
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पत्र क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. १८९/सांका.४, दिनांक २३.०६.२०२२ व दि. ०६.०७.२०२२
४) ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे पत्र क्र. स्वा.अ.म.-ग्रा.वि./क्षे.अ/२०२२/प्र.क्र.२९, दि.०६.०७.२०२२
५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. ११०(भाग-२)/सांका.४,दि.२०.०६.२०२२

महोदय,

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात. स्वतंत्र संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतिकारक/स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक २०.०६.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने हर घर तिरंगा अभियानासाठी ग्रामीण विकास विभागास राज्य समन्वय संस्था म्हणून नामनिर्देशित केले आहे. या उपक्रमाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

❖ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापना/सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयस्फूर्तीने करणे



Scanned by CamScanner

अपेक्षित आहे.

- संदर्भाधीन क्र.४ अन्वये ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार नगरपालिका क्षेत्रात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यान्वयन समितीच्या सूचनेनुसार सदर कार्यक्रम मुख्याधिकारी नगरपरिषदा/ नगरपंचायत यांनी राबवावा.
- महानगरपालिका क्षेत्रात संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी शहरी भागासाठी कार्यान्वयन समिती स्थापन करुन. जिल्हा कार्यान्वयन समितीशी समन्वय साधून सदर कार्यक्रम राबवावा.
- तिरंगा हा नि:शुल्क असणार नाही. नागरिकांनी तो स्वेच्छेने विकत घेण्यासाठी लोकांना प्रेरित करण्यात यावे. प्रत्येक आयुक्तांनी महानगरपालिका क्षेत्राला आवश्यक असलेल्या ध्वजांची संख्या निश्चित करणे महत्वाचे आहे.
- या उपक्रमासाठी शहरी भागात कुटुंबे/घरे/इमारती यांची संख्या निर्धारित करावी. तसेच त्याप्रमाणे ध्वजांची संख्या निश्चित करावी.
- विविध स्तरातून सहकार्य मिळविण्यासाठी शाळा-महाविद्यालये, एनसीसी, एनएसएस, स्वयं सहाय्यता समूह इत्यादी मधून तिरंगा वॉलेंटीयर्स म्हणून नियुक्त करणे, तसेच स्थानिक स्तरावरुन पालकमंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी/सदस्य, इतर प्रतिष्ठित नागरिक, खेळाडू, अधिकारी यांचेद्वारा नागरिकांना हर घर तिरंगा अभियानाबाबत आवाहन करण्यात यावे.
- प्रत्येक नागरिकाने तिरंगा झेंडा संहिताचे पालन करावे, याकरीता नागरिकांना माहिती देण्यात यावी.
- केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महानगरपालिका स्तरावरील विविध सरकारी कार्यालये/संस्था हे साठवणूक आणि विक्री केंद्र असतील, याप्रमाणे आपणास नियोजन करावयाचे आहे.
- महाराष्ट्रात खालीलप्रमाणे तिरंगा झेंडा पुरवठादार आहेत, जेथून ठोक स्वरुपात आपण झेंडा खरेदी करु शकता.

  १. KVIC
  २. NCCF केंद्र सरकार उपक्रम.
  ३. GEM पोर्टल
  ४. स्थानिक विक्रेते, स्वयंसहाय्यता महिला समूह इ.
  ५. Indiamart सारखी ऑनलाईन खरेदी
  ६. याशिवाय मुंबईत द फ्लॅग कंपनी वसई, द फ्लॅग शॉप इ.
  ७. तसेच भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून कळविण्यात आलेले काही तिरंगा पुरवठादाराचे संपर्क श्री.कबीर कुमार. - ७०९१४७२५५५, ८८००२६५७७९, ई-मेल aniratcontracts@gmail.com याप्रमाणे असून मुंबईतील आणखी एक पुरवठादार श्री.पुष्कर नाईक - ८८००४८८०३०, ९८५९५८८३२५ हे असून जे NCCF आणि खरेदीदार यांच्यात समन्वय साधून प्रभागस्तरावर झेंडे वाटपाबाबत सूध्दा पर्याय वापरता येईल.

- वरील विक्रेत्यांना किंवा स्थानिक विक्रेत्यांना आपल्या महानगरपालिका क्षेत्रातील आवश्यक घरांच्या संख्येनुसार पुरवठा आदेश दिला जाऊ शकतो. महानगरपालिका स्तरावरील प्रभागनिहाय विविध सरकारी कार्यालये/संस्था येथून स्थानिक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने तिरंगा खरेदी करण्याबाबत महानगरपालिका क्षेत्रात जाणीवजागृती निर्माण करुन हर घर तिरंगा उपक्रम यशस्वी करण्यात यावा.
- "हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील घरांची, संस्थांची निश्चिती, त्यासाठी आवश्यक झेंडेची संख्या, त्यांची खरेदी, वितरण, उत्पादन, प्रत्यक्षात झेंडे लावणे इ. सर्व बाबींची पूर्तता, संपूर्ण नियोजन आपले स्तरावरुन करण्याची जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.



Scanned by CamScanner

पं.४

या उपक्रमाचे नियोजन पुढीलप्रमाणे असावे:-

| अ.क्र. | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १. | कार्यक्रमाची रुपरेषा, घरांची संख्या-लक्ष्य निर्धारित करुन शासनास कळविणे | ०८ जुलै |
| २. | विविध स्तरावर "हर घर तिरंगा" उपक्रमाबाबत प्रशिक्षण, जाणीवजागृती करणे. | ०७ जुलै ते १५ जुलै |
| ३. | विविध स्तरावर लक्ष्य संख्यानुसार झेंडा पुरवठादार निश्चित करणे | ११ जुलै ते १५ जुलै |
| ४. | शाळा-कॉलेजेस, एनसीसी, एनएसएस इत्यादी मधून तिरंगा वॉलेंटियर्स म्हणून नियुक्त करणे | १६ जुलै ते २० जुलै |
| ५. | शहरी भागातील घरांवर, दुकाने, विविध संस्था, कार्यालयांवर तिरंगा फडकविणेसाठी उपलब्ध झेंड्याची संख्या निर्धारित करणे | २० जुलै ते ३० जुलै |

अधिक माहितीसाठी संदर्भीय शासन परिपत्रक व सादरीकरण सोबत जोडले आहे.

या उपक्रमासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास ,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व ग्राम विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई यांना खालील ई-मेलवर पाठविण्यात यावा. ud२०.urban-mh@mah.gov.in, maharddat७५@gmail.com, mahaculture@gmail.com, maha.amrutbharat@gmail.com

आपली,

(प्रियांका कुलकर्णी-छापवाले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार), मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त यांना माहिती व कार्यवाहीसाठी
१२. सर्व जिल्हाधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी
१३. सर्व मुख्याधिकारी यांना उचित कार्यवाहीसाठी.



Scanned by CamScanner

प-५

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

७ वा मजला, बांधकाम भवन, मर्झबन रोड, फोर्ट, मुंबई - 400 001
Email ID:- maharddat75@gmail.com

दि: ०६.०७.२०२२

जा.क्र. स्वा.अ.म.-ग्रा.वि.क्षे.अ./२०२२ प्र.क्र./२९

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व)

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय :-स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ:-1) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पत्र क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१८९ /सां का.४ दि २३/०६/२०२२

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वतंत्र संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतिकारक/स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक २०.०५.२०२२ च्या शासन परीपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने हर घर तिरंगा अभियानासाठी ग्रामीण विकास विभागास राज्य समन्वय संस्था म्हणून नामनिर्देशित केले आहे, या उपक्रमाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापना/सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करणे अपेक्षित आहे.

- तिरंगा हा निशुल्क असणार नाही, नागरिकांनी तो स्वच्छेने विकत घेण्यासाठी लोकांना प्रेरित करण्यात यावे. प्रत्येक जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेला आवश्यक असलेल्या ध्वजांची संख्या निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

- या उपक्रमासाठी ग्रामीण भागात जवळपास १.४६ कोटी कुटुंबे/घरे असून इतर कार्यालये, संस्था मिळून १.५० कोटी ध्वज फडकवता येईल असा अंदाज आहे.

- विविध स्तरातून सहकार्य मिळविण्यासाठी शाळा-कॉलेजेस, एनसीसी, एनएसएस, स्वयं सहाय्यता समूह, युवा मंडळ इत्यादी मधून तिरंगा वॉलेंटीयर्स म्हणून नियुक्त करणे, तसेच स्थानिक स्तरावरून पालकमंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी/सदस्य, इतर प्रतिष्ठित नागरिक, खेळाडू, अधिकारी यांचेद्वारा नागरिकांना हर घर तिरंगा अभियानाबाबत आवाहन करण्यात यावे.

Scanned by CamScanner

प्रत्येक नागरिकाने तिरंगा झेंडा संहिताचे पालन करावे. याकरीता नागरिकांना माहिती देण्यात यावी.

- प्रत्येक नागरिकाने तिरंगा झेंडा संहिताचे पालन करावे. याकरीता नागरिकांना माहिती देण्यात यावी. ग्रामपंचायत व विविध सरकारी कार्यालये/संस्था हे
- केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामपंचायत व विविध सरकारी कार्यालये/संस्था हे साठवणूक आणि विक्री केंद्र असतील. याप्रमाणे आपणास नियोजन करावयाचे आहे.
- महाराष्ट्रात खालीलप्रमाणे तिरंगा झेंडा पुरवठादार आहेत. जेथून ठोक स्वरुपात आपण झेंडा खरेदी करू शकता.
  1. KVIC
  2. NCCF-केंद्र सरकार उपक्रम.
  3. GEM पोर्टल
  4. स्थानिक विक्रेते, स्वयंसहाय्यता महिला समूह इ.
  5. Indiamart सारखी ऑनलाइन खरेदी
  6. याशिवाय मुंबईत द फ्लॅग कंपनी वसई, द फ्लॅग शॉप इ.
- तसेच भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून कळविण्यात आलेले काही तिरंगा पुरवठादाराचे संपर्क : श्री. कबीर कुमार - ७०९१४७२५५५, ८८००२६५७७९, इमेल - aniratcontracts@gmail.com याप्रमाणे असून मुंबईतील आणखी एक पुरवठादार श्री. पुष्कर नाईक- ८८००४८८०३०, ९८५९५८८३२५ हे असून जे NCCF आणि खरेदीदार यांच्यात समन्वय साधून तालुकास्तरावर झेंडे वाटपाची तयारी दर्शविली आहे.
- वरील विक्रेत्यांना किंवा स्थानिक विक्रेत्यांना आपल्या जिल्ह्यातील आवश्यक घरांच्या संख्येनुसार पुरवठा आदेश दिला जाऊ शकतो. तिरंगा झेंडा साठवणूक केलेल्या ग्रामपंचायत येथून स्थानिक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने तिरंगा खरेदी करण्याबाबत ग्रामपंचायत क्षेत्रात जाणीवजागृती निर्माण करून हर घर तिरंगा उपक्रम यशस्वी करण्यात यावा.
- 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील घरांची, संस्थाची निश्चिती, त्यासाठी आवश्यक झेंडेची संख्या, त्यांची खरेदी, वितरण, उत्पादन, प्रत्यक्षात झेंडे लावणे इ. सर्व बाबींची पूर्तता, संपूर्ण नियोजन आपले स्तरावरून / जिल्हास्तरावरून करण्याची जबावदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

या उपक्रमाची जिल्हास्तरावर पुढीलप्रमाणे कार्यान्वयन समिती असेल .

**जिल्हास्तरीय कार्यान्वयन समिती**

| | | |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सहअध्यक्ष |
| 3 | पोलीस अधीक्षक | उपाध्यक्ष |
| 4 | विद्यापीठाचे कुलसचिव द्वारा उक्त प्रतिनिधी | सदस्य |
| 5 | मुख्याधिकारी, नगरपालिका | सदस्य |
| 6 | जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| 7 | जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य |
| 8 | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| 9 | महाप्रबंधक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| 10 | जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी | सदस्य |
| 11 | समन्वयक, MSRLM | सदस्य |
| 12 | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

Scanned by CamScanner

या उपक्रमाचे नियोजन पुढीलप्रमाणे असावे .

| अ.क्र. | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| 1 | कार्यक्रमाची रूपरेषा, घरांची संख्या-लक्ष्य निर्धारित करून शासनास कळविणे | 08 जुलै |
| 2 | विविध स्तरावर 'हर घर तिरंगा' उपक्रमाबाबत प्रशिक्षण, जाणीवजागृती करणे, जिल्ह्यांना निर्देश देणे | 7 जुलै ते 15 जुलै |
| 3 | विविध स्तरावर लक्ष्य संख्यानुसार झेंडा पुरवठादार निश्चित करणे | 11 जुलै ते 15 जुलै |
| 4 | शाळा-कॉलेजेस, एनसीसी, एनएसएस, युवा मंडळ इत्यादी मधून तिरंगा वॉलेंटीयर्स म्हणून नियुक्त करणे | 16 जुलै ते 20 जुलै |
| 5 | ग्रामीण भागात राज्यातील घरांवर, दुकाने, विविध संस्था, कार्यालयांवर तिरंगा फडकविणेसाठी उपलब्ध झेंड्याची संख्या निर्धारित करणे | 20 जुलै ते 30 जुलै |

अधिक माहितीसाठी संदर्भीय शासन परिपत्रक व सादरीकरण सोबत जोडले आहे.

या उपक्रमासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास व पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मदाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई यांना खालील ईमेलवर पाठविण्यात यावा.

mahardd.at75@gmail.com, mahaculture@gmail.com, maha.amrutbharat@gmail.com

सोबत – १. संदर्भीय परिपत्रक

२. सादरीकरण

(राजेश कुमार, भा.प्र.से )
अपर मुख्य सचिव
ग्राम विकास व पंचायत राज विभाग

प्रत :-

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
2. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
3. अपर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
4. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग(राजशिष्टाचार), मंत्रालय, मुंबई
5. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
6. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
7. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
8. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई
9. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
10. सर्व विभागीय आयुक्त यांना माहिती व कार्यवाहीसाठी
11. जिल्हा नोडल अधिकारी, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व) यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० जून, २०२२

वाचा :- १) केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाचे सादरीकरण
दिनांक १२ एप्रिल, २०२२ व दिनांक २० मे, २०२२
२) भारतीय ध्वज संहिता २००५

प्रस्तावना :-

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने "हर घर झंडा" या विषयावरील दि.१२.०४.२०२२ व दि. २०.०५.२०२२ च्या दोन स्वतंत्र सादरीकरणांद्वारे या कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने विविध निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये, (१) या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/ शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतींवर व नागरिकांनी स्वत:च्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिद्धी मोहिम राबविण्यात यावी. (२) याबाबत सुक्ष्म नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्यात येऊन उपरोक्त कालावधीत सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात यावा. (३) या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय/ निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी. (४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करावा, अशा सूचनांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या "हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबतच्या दि. १२.०४.२०२२ च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग तसेच जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे. तसेच, दि.२०.०५.२०२२ च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांना यापूर्वीच पाठविण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सदरच्या मार्गदर्शक सूचना सर्व विभागांच्या पुनश्च: निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

शासन परिपत्रक :-

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या सांस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरूपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहेत :-

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून देशाभिमान व जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी.

२) दिनांक ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच, प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणेसाठी नागरीकांना प्रोत्साहीत करावे.

३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरीत करावे.

४) सदर राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा.

५) केंद्रिय गृह विभाग यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग-१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे "हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या लोकर/सुत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल", या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सदर बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत / पॉलिस्टर/ लोकर/ सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल.

६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल.

७) "हर घर झंडा" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी.

८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी.

९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होणेबाबत खात्री संबंधित यंत्रणांनी करावी.

१०) ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करुन द्यावे

११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.



Scanned by CamScanner

१२) "हर घर झंडा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केन्द्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेत स्थळावर अपलोड करावे.

१३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरीकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा सोबत परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०६२०१८१९२१८२२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सोबत - परिशिष्ट - अ

VILAS RAMRAO THORAT

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४.



Scanned by CamScanner

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबत

## परिशिष्ट - अ

(अ) कृती आराखडा : ग्राम पंचायती

- सर्व ग्राम पंचायती - ग्रामीण प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- संबंधित विभागांच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्राम पंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे.
- प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग स्थानिक : शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- ग्राम पंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

(आ) कृती आराखडा : आरोग्य केंद्रे, रुग्णालये + ANM

- आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा या उपक्रमात महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.
- लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत.
- रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

(इ) कृती आराखडा : रास्त भाव धान्य दुकाने (वाजवी किंमतीची दुकाने)

- रास्त भाव दुकाने :- ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे.
- या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, सांगितिक जाहिराती (जिंगल), राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी.



Scanned by CamScanner

(ई) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये

- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #harghartiranga या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

(उ) कृती आराखडा : पोलीस

- पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे.
- विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत.
- हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार, प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे.
- पथनाट्यांद्वारे तिरंग्याची आण-बाण-शान या संकल्पनेचा प्रसार करण्यात यावा.
- पोलिस स्टेशन परिसरात - फलक, प्रसिध्दीपत्रके, उभे फलक (स्टॅंडी) लावणे व ध्वजारोहण करणे.
- पोलिस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.
- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतींमध्ये /घरी ध्वजारोहण करावे.
- प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी.

(ऊ) कृती आराखडा : परिवहन सुविधा

- राज्य परिवहनच्या बसेस "हर घर झंडा" याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात.
- पथकर व तपासणी नाके यांचे माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निमार्ण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे.
- अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये - सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.



Scanned by CamScanner

-५.13

(ए) कृती आराखडा : - प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भितीचित्रे इ.

- सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ (amritmahotsav.nic.in) हर घर झेंड्याचा दुवा जोडावा.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत -
- १ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दुरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा.
- स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा.
- ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात.
- सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

(ऐ) कृती आराखडा : महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत

- सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत - नागरी भागातील प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करुन संपर्क सत्रे / चर्चासत्रे याचे आयोजन करावे.
- प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग : स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- महानगर पालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी. तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.



Scanned by CamScanner

पृ.१९



- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने

(ओ) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालील स्वरुपाचे सहाय्य उपलब्ध केले जाईल.

- आजादी का अमृत महोत्सव (amritmahotsav.nic.in) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर
- अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड कराव्यात.
- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने
- ध्वजगीत व ध्वनिचित्रफित पुरविणे.

*-*-*-*-*-*

Scanned by CamScanner

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.काअ /मुख्या/ २०७३ /पुवाज दि. 11 JUL 2022

**विषय** - १. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवअंतर्गत स्वराज्य महोत्सव उपक्रम राबविण्याबाबत.
२.हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा.

**संदर्भ** –१. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. संकीर्ण/८२५२/प्रक्र १६१ / सां.का.४ दि. ३०.०६.२०२२ (पृ.क्र.प/३-१४)
२. क्र.सी/कार्या-७ब/कावि-स्वातं.अमृत महो./२०२२ दि. ०४.०७.२०२२ (पृ.क्र.प/१)
३. क्र.एमजीसी/जी/८६४७ दि. ०४.०७.२०२२ (पृ.क्र.प/१)
४. क्र.अति आ/पूउप/आयुक्त/३४६६दि. ०५.०७.२०२२ (पृ.क्र.प/१)
५. क्र.अतिआ/पूउप/आयुक्त/३४८४/दि. ०७.०७.२०२२ (पृ.क्र.प/२१)

स्वराज्य महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम/उपक्रमांचे यशस्वीरित्या जास्तीत-जास्त जन सहभागातून आयोजन/उपक्रमांचे नियोजन करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने, मा. आयुक्त यांना सादर केलेले पत्र व त्यावरील मा. अति. आयुक्त(पू.उप.) यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये शिक्षणाधिकारी व या विभागाला, दि.०५.०७.२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामधील बैठकीस उपस्थित राहण्याकरिता केलेली सूचना कृपया अवलोकन करावी.

तसेच, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त विषयाबाबत शुक्र. दि. ०८.०७.२०२२ रोजी दुपारी ३ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस हजर राहण्याकरिता मा. अति. आयुक्त(पू.उप.) यांनी अग्रेषित केलेलेपत्र कृपया अवलोकन करावे.

दि. ०५.०७.२०२२ रोजी व दि. ०८.०७.२०२२ रोजीच्या उपरोक्त विषयाबाबतची बैठकीस उपस्थित राहिल्यावर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व मा. मुख्य सचिव यांनी मुंबई महानगरपालिकेबाबत केलेल्या सूचनांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे -

दि.०५.०७.२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त पृ.प/२३ ते २९ वर स्थित आहे तसेच दि.०८.०७.२०२२ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या बैठकीनुसार, खालील बाबींबाबत मुंबई महानगरपालिकेला कार्यवाही करावयाच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार या विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

| क्र. | विषय | आवश्यक कार्यवाही | पालिकेतील संबंधित आस्थापना |
|---|---|---|---|
| १. | दि. ११ ऑगस्ट, २०२२ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत हर घर तिरंगा | शासकीय / निमशासकीय आस्थापना इमारतींवर व प्रत्येक नागरिकांचा घरावर राष्ट्रध्वज उभारणे | पालिकेतील सर्व आस्थापने |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाचे बॅनर/स्टॅंड व नोडल अधिकारी नेमणूक | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाची माहिती / लोगो इत्यादी शाळा कॉलेज बाजार इ. ठिकाणी प्रचार तसेच लोकप्रतिनिधीना सहभागी करुन घेणे | पालिकेतील सर्व आस्थापने |
| ३. | राष्ट्र समुहगान | संबंधित विभागांनी कार्यालयाच्या ठिकाणी, शाळेत, कॉलेजमध्ये दि.०९ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. राष्ट्रगान कार्यक्रम आयोजित करावा. | शिक्षणाधिकारी |
| ४. | आयकॉनिक सांस्कृतिक कार्यक्रम | जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, थोर व्यक्तिमत्व यांचा महाराष्ट्रातील जडणीघडणीतील सहभाग यावर कार्यक्रम आयोजित करणे. | जनसंपर्क विभाग/ राजशिष्टाचार विभाग |
| ५. | लाईट ॲण्ड साउंड प्रोजेक्शन शो | जिल्ह्यातील सांस्कृतिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे येथे रोशणाई करून त्याठिकाणचा इतिहास लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे | जनसंपर्क विभाग |
| ६. | वरळी वांद्रे सीलिंक वर आकर्षण विद्युत रोषणाई करणे | वरळी वांद्र सी-लिंक सारख्या महत्वाची ठिकाणे ठरवून सदर वास्तुवर/ठिकाणांवर आकर्षक विद्युत रोषणाई करणे | |
| ७. | हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण | जिल्ह्यातील सर्व हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करणे, त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल | पुरातन वास्तु जतन कक्ष |
| ८. | स्थानिक स्वराज्य संस्था विशेष सभा | जिल्ह्यातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशेष सभांचे आयोजन करण्यात यावे. | पालिका चिटणीस आयुक्त कार्यालय |
| ९. | जिल्हा ठिकाणी तिरंगा बलून सोडणे | जिल्हयातील प्रमुख संस्थेच्या मुख्यालय ठिकाणी स्वातंत्र्यदिनी तिरंगी रंगाचे बलुन आकाशात सोडणे. | मुख्यालय-परिरक्षण |
| १०. | रस्ते संग्रहालय/प्रदर्शने अनसंग हिरो बुकलेट | जिल्हयातील अनाम वीर, स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे यांचे दुर्मिळ फोटो व त्यांच्या कार्याची माहिती यासाठी प्रदर्शन, कार्यक्रम आयोजित करणे तसेच जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात यावे. | जनसंपर्क विभाग |
| ११. | फ्रिडम जाईन (प्रभात फेरी) वारसा स्थळ पदयात्रा | जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये / कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे तसेच जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणी एनजीओ/सामान्य नागरिकांच्या सहाभागातून पदयात्रा काढण्यात यावी. | शिक्षणाधिकारी |
| १२. | ७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज | जिल्हयातील प्रमुख संस्थाच्या मुख्यालय ठिकाणी तसेच प्रमुख ठिकाणी ७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज उभारणे | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | एन सीसी / एनएसएस सायक्लोथॉन/मॅरेथॉन | स्वातंत्र्यदिनी एनसीसी/एनएसएस कॅडेट चे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन/मॅरेथॉनचे आयोजन करणे | शिक्षणाधिकारी |
| १४. | विविध स्पर्धा निबंध, वकृत्व/चित्रकला सांस्कृतिक कार्यक्रम<br>विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम | दि.०९ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शालेय/महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा निबंध, वकृत्व/चित्रकला स्पर्धांचे आयोजन करणे.<br>सदर कालावधीत विद्यापीठ स्तरावर कार्यशाळा, चर्चासत्रे, विविध स्पर्धा/ जाणीव जागृती इ. कार्यक्रमाचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी |
| १५. | हर घर तिरंगा/ स्वांतत्र्याचा अमृत महोत्सव आकाम लोगो शासकीय इमारतीवर लावणे | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त प्रत्येक नागरिकाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमात सहभागी होताना घरांवर, इमारतीवर झेंडा उभारावा. तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयाची ठिकाणी इतर संलग्न ठिकाणे उदा. शिधावाटप दुकाने, संस्था याठिकाणी झेंडा उभारण्याबाबत आवश्यक सुचना/उपाययोजना करणे. | सर्व आस्थापने |
| १६. | वृक्षारोपण / वृक्ष लागवड | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शासकीय जागेवर शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करणे. | उद्यान अधिक्षक |
| १७. | मोबाईल दुष्परिणाम मार्गदर्शन चर्चा | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शालेय-महाविद्यालय स्तरावर मोबाईल दुष्परिणाम मार्गदर्शनपर चर्चा सत्र आयोजित करावी. ऑनलाईन फसवणूक, ब्लॅकमेलिंग, आर्थिक फसवूणक वाया जाणारा वेळ मुलांच्या अभ्यासावर होणारा परिणाम, आरोग्यावर होणारा परिणाम यांची माहिती देणे. | शिक्षणाधिकारी |
| १८. | महिला मेळावे/महिला बचत गट: मार्गदर्शन / किशोरी मेळावे | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत महिला मेळाव्यांचे / किशोरी मेळावे आयोजन करण्यात यावे. तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन भरविणे. | सहाय्यक आयुक्त(नियोजन) |

सदर बैठकीनुसार सर्वसाधारण मार्गदर्शन सूचना देण्यात आल्या.

- स्वराज्य महोत्सव मध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रम पत्रिका, निमंत्रण पत्रिका, पोस्टर, होर्डिंग यावर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे लोगो व सांस्कृतिक कार्य विभागाचे लोगो लावण्यात यावेत.
- संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे फोटो व माहिती मराठी भाषेत २०० शब्दांत https://mahaamrut.org या वेबसाईटवर अपलोड करावेत.

* संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे फोटो व हिंदी/इंग्रजी भाषेत २०० शब्दांत माहिती https://amritmahotsav.nic.in/ या वेबसाईटवर अपलोड करावेत.
* कार्यक्रमाचे फोटो/ बातम्यांची कात्रणे/ चित्रफिती यांचा अहवाल जिल्हाधिकारी/मुख्य कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत सादर करावा.
* दिनांक १५ सप्टेंबर २०२२ पर्यंत उपयोगिता प्रमाणपत्र अग्रेषित करावे.
* स्वराज्य महोत्सवाबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का. ४ दिनांक ३० जून २०२२ नुसार तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.
* हर घर तिरंगा बाबत शासन परिपत्रक क्र संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सां.का.४ दिनांक २० जून, २०२२ नुसार तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अतएव, माहितीसाठी व पालिकेतील सर्व विभाग कार्यालये, आस्थापने यांना सूचित करण्यासाठी, सविनय सादर.

११/०७/२२

कार्यकारी अभियंता (मुख्यालय)

**मा. अति. आयुक्त (पूर्व उप.)**

बृहन्मुंबई महानगरपालिका
अतिरिक्त आयुक्त (पूर्व. उप) यांचे कार्यालय
11 JUL 2022
क्र. अति. आ/पूर्व. उप/ 4771

११/०७/२०२२

महोदया,

सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपरोक्त नमूद कार्यक्रम घेण्यात येत आहेत. मुंबई महानगरपालिकेत देखील याकरीता एक nodal officer व nodal department असणे गरजेचे आहे. त्या विभागाने मा. आयुक्तांचे निर्देश घेऊन उपरोक्त शीर्षकात नमूद सर्व विभागांना सदर आदेश निर्गमित करणे योग्य राहील. याकरीता J+MC (GAD) अथवा DMC (Special) यांना याकरीता nodal officer म्हणून नियुक्त करावे व शासनाचा आदेश तंतोतंत पालन करण्याची व महापालिकेच्या सर्व विभागांना निश्चित कार्यक्रम देऊन त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी द्यावी लागेल. उपरोक्त प्रस्ताव विचारार्थ व आदेशार्थ सादर.

JMC (GAD) to coordinate

AMC(GAD)/C/8559/D
12/07/2022

11.7.22
A.M.C. (E.S.)

अति आयुक्त (शहर)
12/7
A.M.C. (City)

मा. महानगरपालिका आयुक्त.

महानगरपालिका आयुक्त

पृ. १९

बृहन्मुंबई महानगरपालिका
अतिरिक्त आयुक्त (शहर)
यांचे कार्यालय

11 JUL 2022

क्र. अति. आ. (शहर)/ 859 /D

(NF)

12/07/2022
Hon'ble MC

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
प्रशासकीय कार्यविभाग

12 JUL 2022

१०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१

क्रमांक MGC/A/8647

(Nagar)

12/07/2022

बृहन्मुंबई महानगरपालिका
कार्यकारी अभियंता (मुख्यालय)
यांचे कार्यालय

12 JUL 2022

(N)

क्र. कार्य अभि / 2231 / मुख्यालय परि.

पृ.२४


महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, रुम नं. २२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२

ईमेल-द्वारे

दुरध्वनी क्र. ०२२ - २२०२ ५६०७

Email ID : tca-mh@nic.in


क्रमांक : संकीर्ण ८२२२/प्र. क्र.१३३/सां.का. ४ दिनांक : १९ मे, २०२२

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य
३. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
४. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
६. सर्व आयुक्त, महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य
७. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

विषय :- "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत
मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली VC द्वारे बैठक

संदर्भ :- शासन समक्रमांक दिनांक ६ मे, २०२२ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रास अनुसरुन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या अंमलबजावणी समितीच्या दिनांक ८ एप्रिल २०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तावर तातडीने कार्यवाही होण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे आयोजित करण्यात आलेली (शुक्रवार दिनांक २० मे, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता) नियोजित बैठक काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेली आहे.

पुढील बैठकीचा दिनांक व वेळ यथावकाश कळविण्यात येईल.

(प्रसाद म. महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
२. प्रधान सचिव (पर्यटन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. उप सचिव (पर्यटन/सां.का./समन्वय) यांचे स्वीय सहाय्यक, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक तथा समन्वयक (स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव), सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
६. निवड नस्ती, सां.का.४

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
दूरध्वनी : ०२२-२६५५६७९९, फॅक्स : २६५५६८०५, इमेल :collectormsd@gmail.com

क्र:सी/कार्या-७डी एच/स्वातंत्र्याचा अमृत महो. इतिवृत्त/२२
दिनांक : ०७/०७/२०२२.

## इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर कार्यालयाच्या समिती सभागृहात दि. ०५.०७.२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम व कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. विकास नाईक | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा |
| २ | श्री. पद्माकर रोकडे | उपविभागीय अधिकारी पूर्व उपनर |
| ३ | श्री. सचिन चोधर | रजा राखीव तहसिलदार, मुंबई उपनगर जिल्हा |
| ४ | श्री. सतिश हिवाळे | सचिव विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उपनगर जिल्हा |
| ५ | श्री. एन.व्ही. पगारे | उप विभागीय अभियंता, उत्तर मुंबई (सा.बा.) विभाग अंधेरी, मुंबई |
| ६ | श्री. एस.एन.सोनार | उत्तर मुंबई (सा.बा.) विभाग अंधेरी, मुंबई |
| ७ | श्री. संजय सावंत | कार्यकारी अभियंता, (मुख्यालय) बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |
| ८ | श्री. यो. ह. सोनवणे | सा.बा. उप विभाग क्र.१ वांद्रे. |
| ९ | श्री. मनोहर अ. तांदळे | उपनियंत्रक शिधावाटप 'ड' परिमंडळ यांचे कार्यालय |
| १० | श्री. हरिष रामचंद्र जगताप | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई |
| ११ | श्री. म. पा पाटील | सहायक कामगार आयुक्त |
| १२ | श्री. प्र. भो. आवळे | सहायक कामगार आयुक्त |
| १३ | श्री. अविनाश काशिनाथ पाटील | शिधावाटप अधिकरी 'ग' परिमंडळ, मुंबई |
| १४ | श्री. मधुकर गुलाब गिरी | शिधावाटप अधिकारी, उपनियंत्रक शिधावाटप कार्यालय, 'ई' परिमंडळ |
| १५ | श्रीमती मालती लोणारे | शिक्षणाधिकारी कार्यालय, करी रोड, मुंबई मनपा. |
| १६ | श्री. सुनिल मेश्राम | बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/एन विभाग, मुंबई |

प.२९

| | | |
|---|---|---|
| १७ | श्रीमती माधुरी साळवी | उपनियंत्रक, शिधावाटप कार्यालय 'ड' परिमंडळ, सांताक्रुझ |
| १८ | नितीन ब. धात्रक | वसाहत अधिकारी, एफ/दक्षिण विभाग, सहा. आयुक्त कार्या, एफ-दक्षिण |
| १९ | श्री. निलेश धनंजय सावं | सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ |
| २० | श्री. सुशिल श. शिदे | राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठ |
| २१ | श्रीमती कावेरी पवार | सहा.अधि.श्रेणी-२, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था – ३, मुंबई |
| २२ | श्रीमती हेमलता कथ्यु गावित | स.शि.उपनिरीक्षक, शिक्षण निरीक्षक,पश्चिम विभाग, जोगेश्वरी-पूर्व |
| २३ | श्रीमती एस. एम. खेते | मोटार वाहन निरीक्षक |
| २४ | श्री. एम.व्ही. दांडेकर | अ.का. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगरे |
| २५ | श्री. राजन धु. गुरबे | वरीष्ठ लिपीक, जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख कार्या, मुंबई उपनगर |
| २६ | श्री. मनेष वाघरिकर | विज नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई |

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने सर्व राज्यांना कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' साजरा करण्याबाबत शासन निर्णय/ शासन परिपत्रक/ शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सुचना दिल्या आहेत. जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्यांचे संस्मरण व्हावे या उद्देशाने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक ९ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये राज्यात **'स्वराज्य महोत्सव'** अंतर्गत विविध स्तरावर आयोजित करावयाच्या विविध उपक्रम/ कार्यक्रम यांचे स्वरुप संदर्भिय शासन निर्णय सोबतच्या परिशिष्ट 'अ' 'ब' 'क' 'ड' मध्ये निश्चित केले आहे. त्यानुसार स्वराज्य महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम/ उपक्रमाचे यशस्वीरीत्या जास्तीत- जास्त जनसहभागातुन आयोजन करणेकामी नियोजन करणेबाबत तसेच सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालील मुद्यांवर चर्चा होऊन सदर विभागीय संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना त्याअनुषंगाने कार्यवाही करणेबाबत सुचना देण्यात आल्या.

| अ.क्र. | विषय | चर्चा | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्र समुहगान | संबंधित विभागांनी कार्यालयाच्या ठिकाणी, शाळेत, कॉलेजमध्ये दि. ०९ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. राष्ट्रगान कार्यक्रम आयोजित करावा. | उपसंचालक उच्च शिक्षण विभाग व उपसंचालक तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, बृहन्मुंबई शिक्षण विभाग, शिक्षण अधिकारी, पूर्व व पश्चिम विभाग, यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील शाळा-कॉलेज यांना सदर कार्यक्रमाचे आयोजन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करणेबाबत निर्देश द्यावेत. तसेच इतर सर्व कार्यालयांनी सदर दिवशी राष्ट्रगान कार्यक्रम राबविण्याबाबत संलग्न व अधिनस्त कार्यालयांना सुचना द्याव्यात. |
| २ | आयकॉनिक सांस्कृतिक कार्यक्रम | जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, थोर व्यक्तिमत्व यांचा महाराष्ट्रातील जडणघणीतील सहभाग यावर कार्यक्रम आयोजित करणे. | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ. |
| ३ | लाईट अॅन्ड साऊंड प्राजेक्शन शो | जिल्हयातील सांस्कृतिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे येथे रोशणाई करून त्याठिकाणचा इतिहास लोकांपर्यंत पाहेचविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ४ | वरळी वांद्रे सीलिंक वर आकर्षक विद्युत रोषणाई करणे | वरळी वांद्रे सीलिंक सारख्या महत्वाची ठिकाणे ठरवून सदर वास्तुवर/ठिकांणावर आकर्षक विद्युत रोषणाई करणे | बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ५ | कॉफीटेबल बूक प्रकाशन | जिल्ह्यातील थोर व्यक्तीमत्वांचे दर्शन घडविण्याऱ्या सचित्र कॉफीटेबलचे अनावरण करणे | जिल्हा लायब्ररी, मुंबई विद्यापीठ |
| ६ | हुतात्मा स्मारकांचे सुशोभीकरण | जिल्ह्यातील सर्व हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करणे, त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल. | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ७ | स्थानिक स्वराज्य संस्था विशेष सभा | जिल्ह्यातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशेष सभांचे आयोजन करण्यात यावे | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ८ | जिल्हा ठिकाणी तिरंगा बलून सोडणे | जिल्ह्यातील प्रमुख संस्थेच्या मुख्यालय ठिकाणी स्वातंत्र्यदिनी तिरंगी रंगाचे बलुन आकाशात सोडणे. | एम.एम.आर.डी.ए., एस.आर.ए., बृहन्मुंबई महानगरपालिका वॉर्ड, मुंबई विद्यापीठ, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर सर्व विभाग |
| ९ | रस्ते संग्रहालय/ प्रदर्शने अनसंग हिरो बुकलेट | जिल्ह्यातील अनाम वीर, स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे यांचे दुर्मिळ फोटो व त्यांच्या कार्याची माहिती यासाठी प्रदर्शन, कार्यक्रम आयोजित करणे. तसेच जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरविण्या यावे. | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ, जिल्हा लायब्ररी, शिक्षण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | डिस्ट्रिकअ डिजिटल रिपॉसिटरी | जिल्ह्यातील स्वातंत्र्यकालीन माहिती अथवा ऐतिहासिक ठिकाणांची माहिती तयार करणे | जिल्हा लायब्ररी, मुंबई विद्यापीठ |
| ११ | फ्रिडम जॉईन (प्रभात फेरी), वारसा स्थळ पदयात्रा | जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये /कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे.<br>तसेच जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणी एनजीओ / सामान्य नागरिकांच्या सहभागातुन पदयात्रा काढण्यात यावी. | बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शिक्षण अधिकारी, पूर्व व पश्चिम विभाग.<br>बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शिक्षण अधिकारी, पूर्व व पश्चिम विभाग. |
| १२ | ७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज | जिल्ह्यातील प्रमुख संस्थाच्या मुख्यालय ठिकाणी तसेच प्रमुख ठिकाणी ७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज उभारणे. | बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण |
| १३ | एन सी सी/ एनएस एस सायक्लोथॉन /मॅरेथॉन | स्वांतत्र्यदिनी एन सी सी/ एनएस एस कॅडेट चे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन/मॅरेथॉनचे आयोजन करणे. | बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग, एसएनडीटी, मुंबई विद्यापीठ |
| १४ | विविध स्पर्धा निबंध, वकृत्व/ चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम<br>विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम | दि. ०९ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शालेय / महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा निबंध, वकृत्व/ चित्रकला स्पर्धांचे आयोजन करणे<br>सदर कालावधीत विद्यापीठ स्तरावर कार्यशाळा, चर्चासत्रे, विविध स्पर्धा/ जाणीव जागृती इ. कार्यक्रमाचे आयोजन करावे | बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग, एसएनडीटी,<br>मुंबई विद्यापीठ, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १५ | हर घर तिरंगा/ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आकाम (AKAM) लोगो शासकीय इमारतीवर लावणे | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवा निमित्त प्रत्येक नागरिकाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमात सहभागी होताना घरावंर, इमारतीवर झेंडा उभारावा. तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयाची ठिकाणे इतर संलग्न ठिकाणे उदा. शिधावाटप दुकाने, संस्था याठिकाणी झेंडा उभाण्याबाबत आवश्यक सुचना/उपाययोजना करणे. | सर्व उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या अखत्यारीतील गृहनिर्माण संस्था यांना सदर कालावधीत झेंडा उभारण्याबाबत आवश्यक त्या सुचना द्याव्यात.<br>तसेच इतर कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त तसेच संलग्न कार्यालयांनी सदर कालावधील स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाचे चिन्ह प्रदर्शनी भागात लावावे, झेडा उभारावा. उपनियंत्रक शिधावाटप कार्यालयांनी शिधावाटप दुकानात शासनमान्य झेंडें विक्रीसाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उपलब्ध करणे. |
| १६ | पुरातत्व दृष्ट्या महत्वांची स्थळे स्वच्छता / कार्यालयांची स्वच्छता | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील पुरातत्व दृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळांची स्वच्छता करण्यात यावी.<br>तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांची या कालावधीत स्वच्छता करण्यात यावी | महाराष्ट्र पर्यटन विभाग, अधिक्षक, भारतीय पुरातत्व विभाग.<br>सर्व विभाग |
| १७ | पुरातत्व/वारसास्थळे दत्तक योजना | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळे देखभाल करण्याकरिता ऐतिहासिक वारसा जपवणूक करण्याच्या संस्थांना दत्तक देण्यासाठी योजना राबविणे. | महाराष्ट्र पर्यटन विभाग, अधिक्षक, भारतीय पुरातत्व विभाग, |
| १८ | संविधान स्तंभ/लामणदिवा | जिल्ह्याच्या मुख्यालय ठिकाणी संविधान स्तंभाची तसेच शासनमान्य लामणदिवा उभारणे. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा नियोजन अधिकारी |
| १९ | वृक्षारोपण / वृक्ष लागवड | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शासकीय जागेवर शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करणे | बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शिक्षण अधिकारी, पूर्व व पश्चिम विभाग, |
| २० | महिला मेळावे/ महिला बचत गट : मार्गदर्शन/किशोरी मेळावे | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत महिला मेळाव्यांचे / किशोरी मेळावे आयोजन करण्यात यावे. तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन भरविणे | जिल्हा महिला व बाल विकास विभाग |
| २१ | मोबाईल दुष्परिणाम मार्गदर्शन चर्चा | दि. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शालेय-महाविद्यालय स्तरावर मोबाईल दुष्परिणाम मार्गदर्शनपर चर्चा सत्र आयोजित करावी. ऑनलाईन फसवणुक, ब्लॅकमेलिंग, आर्थिक फसवणूक, वाया जाणारा वेळ, मुलांच्या अभ्यासावर होणारा परिणाम, आरोग्यावर होणारा परिणाम यांची माहिती देणे | बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, शिक्षण अधिकारी, पूर्व व पश्चिम विभाग, मुंबई विद्यापीठ, आरोग्य विभाग |
| २२ | कामगार नोंदणी | संबंधित क्षेत्रातील कामगारांची PM-Shram, PMSBY, PMJJY, APY मध्ये नोंदणी करणे/ चालान देणे | उपायुक्त कामगार विभाग |

पृ.२८

तसेच उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने कार्यक्रमांचे नियोजन करून पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या. तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे अहवाल व फोटो या कार्यालयाचे ई-मेल आयडी collectormsd@gmail.com वर पाठविण्यास सांगितले. तदनंतर बैठकीस उपस्थितांचे सर्व संबंधितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे

(विकास गजरे)
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)
मुंबई उपनगर

प्रत-

१. मा. आयुक्त, मुंबई प्रादेशिक प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई – ५१.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई – ५१.
३. पोलीस उपायुक्त, परिमंडळ (सर्व)
४. उपविभागीय अधिकारी, पूर्व व पश्चिम उपनगर
५. सचिव, विधी सेवा प्राधिकरण, मुं.उ.जि. हायपिक अपा., भवनानी इस्टेट, जूने वांद्रे कोर्ट, वांद्रे (प), मुंबई ५०.
६. उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका (सर्व)
७. अधिक्षक, भारतीय पुरातत्व विभाग, सायन, मुंबई
८. मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी, बोरीवली, कुर्ला
९. जिल्हा नियोजन अधिकारी, मुं.उ.जि.
१०. अधिक्षक, भूमी अभिलेख,मुं.उ.जि.
११. तहसिलदार अंधेरी / बोरीवली / कुर्ला
१२. संचालक उच्च शिक्षण विभाग, चर्चगेट, मुंबई
१३. संचालक तंत्र शिक्षण विभाग, चर्चगेट, मुंबई
१४. जिल्हा अधिक्षक, कृषी, मुं.ऊ.जि. वागळे इस्टेट, आयशेर आय टी पार्क जवळ, ठाणे (पश्चिम) ६०४.
१५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ इंडस्ट्रियल एरीया, उद्योग सारथी, महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ९३
१६. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुं.उ.जि. ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई ०१.
१७. उप आयुक्त, वाहतुक विभाग, पूर्व व पश्चिम उपनगर, दादर, मुंबई
१८. सहाय्यक आयुक्त, कामगार विभाग, मुं.उ.जि. कामगार भवर, वांद्रे (पूर्व), मुंबई – ५१.
१९. सह संचालक, खेरवाडी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ५१
२०. सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मुं.उ.जि.
२१. विभागीय वन अधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, पश्चिम द्रुतगतीमार्ग, बोरीवली (पूर्व), मुंबई.
२२. उपायुक्त, प्रादेशिक परिवहन विभाग, मुं.उ.जि. फाऊंटन इमारत, एम.टी.एन.एल. जवळ, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ०१.
२३. व्यवस्थापक, पर्यटन विकास महामंडळ, अे.पी.जी. हाऊस, के.सी. कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई - २०.
२४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था -२,३,४
२५. कार्यकारी अभियंता, उत्तर विभाग, मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई
२६. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुं.ऊ.जि. २ रा मजला, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१
२७. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, प्रशासकीय इमारत, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई – ७१

२८. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, प्रशासकीय इमारत, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई ७१
२९. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मु.उ.जि. प्रशासकीय इमारत, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई - ७१
३०. जिल्हा क्रीडा अधिकारी, मु.उ.जि. स्पोर्ट अँथोरीटी ऑफ इंडिया, समता नगर पोलीस स्टेशनच्या बाजूला, कांदिवली (पूर्व), मुंबई १०१
३१. सांस्कृतिक विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ९८.
३२. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, मु.उ.जि. बँक ऑफ इंडिया, नटराज मार्केट समोर, एस.व्ही. रोड, मालाड, (पश्चिम), मुंबई - ६४.
३३. उपनियंत्रक, शिधावाटप कार्यालय, परिमंडळ 'ड', 'ग' 'ई'
३४. शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर
३५. निबंधक, SNDT विद्यापीठ, सांताक्रुझ
३६. शिक्षण निरीक्षक पश्चिम विभाग, इस्माईल युसुफ कॉलेज कॅम्पस, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ६०.
३७. शिक्षण निरीक्षक, उत्तर विभाग, नविन प्रशासकीय इमारत, बिल्डिंग नं-२, दुसरा मजला, आरसी मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ७१


प.31

## (No subject)

Sanjay Sawant <sanjaymsawant@gmail.com>

Mon 11/07/2022 12:29

To: SANJAY SURYAKANT GOLATKAR <se01dcews2.bp@mcgm.gov.in>



# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

विषय- हर घर तिरंगा उपक्रम राबविण्याबाबत.
संदर्भ- क्र.संकीर्ण-2021/प्र.क्र.211/नवि.20 दि.07/07/2022

महाराष्ट्रात खालीलप्रमाणे तिरंगा झेडा पुरवठादार आहेत.जेथून ठोक स्वरूपात आपण झेंडा खरेदी करू शकता.

1) kVC
2) NCCF केंद्र सरकार उपक्रम.
3) GEM पोर्टल
4) स्थानिक विक्रेते,स्वयंसहायता महिला समूह इ.
5) INDIA MART सारखी ऑनलाईन खरेदी
6) याशिवाय मुंबईत द फ्लॅग कंपनी वसई,द फ्लॅग शॉप इ.
7) तसेच भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून कळविण्यात आलेले काही तिरंगा पुरवठादाराचे संपर्क श्री.कबीर कुमार -7091472555,8800265779 ई-मेल-aniratcontracts@gmail.com याप्रमाणे असून मुंबईतील आणखी एक पुरवठादार श्री.पुष्कर नाईक-8800488030,9859588325 हे असून जे NCCF आणि खरेदीदार यांच्यात समन्वय साधून प्रभागस्तरावर झेंडे वाटपाबाबत सुध्दा पर्याय वापरता येईल.